

# परिकल्पना २

## शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना






BAIF

apmas

# शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या भूमिका

## प्रशासकीय



- सभासदांची नोंदणी करणे तसेच रद्द करणे
- पदाधिकाऱ्यांची निवडणूक करणे तसेच पदावनत करणे
- धोरणे आणि योजना बनवणे
- कार्य समित्या / उपसमित्यांची स्थापना
- कर्मचाऱ्यांची नेमणूक व त्यांच्या कामगिरीचा आढावा
- प्रगतीचा नियमित आढावा
- इतर संस्था, संघटना आणि फेडरेशनची सदस्यता घेणे

## आर्थिक

- निधी जमा करणे
- निधीचा उपयोग
- निधी आणि मालमत्ता सुरक्षित ठेवणे
- बँक खात्याची देखभाल
- लेखा पुस्तकांची देखभाल
- अतिरिक्त शिलकीचे वाटप
- कमतरता व्यवस्थापन



## वैधानिक




- निवडणुकांचे आयोजन करणे
- हिशोबाचे लेखापरीक्षण
- वार्षिक विवरण पत्रे भरणे
- घटनेमध्ये सुधारणा
- बैठकांचे आयोजन – सर्वसाधारण मंडळ


२

# परिकल्पना

## शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना

शेतकरी संस्थेच्या संचालकांसाठी
अभ्यास पुस्तिका संच





DGRV
apmas
BAIF

# परिकल्पना

## शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना

**प्रथम आवृत्ती – मे २०२१**

**किंमत – रु.१००/–**

**पुनर्मुद्रणाचे हक्क राखीव आहेत.**

एपीएमएएसच्या परवानगीने आणि एपीएमएएस आणि डीजीआरव्ही लोगो वापरुन सामग्री पुन्हा मुद्रित केली जाऊ शकते.

पुस्तकांच्या मागणीसाठी आपण एपीएमएएस आणि बाएफच्या कार्यालयात फोन किंवा मेलद्वारे संपर्क साधू शकता.

**द्वाराप्रकाशित**

**महिला अभिवृद्धी सोसायटी (एपीएमएएस)**

प्लॉट क्र. ११ आणि १२, हुडा कॉलनी, तानेशानगर, माणिकोंडा

हैदराबाद – ५०००८९, तेलंगणा, भारत

कार्यालय – ०८४१३–४०३११८ / ०८४१३–४०३१२०

ई–मेल – info@apmas.org वेबसाईट – www.apmas.org

आणि

**बाएफ विकास अनुसंधान प्रतिष्ठान**

डॉ मणिभाई देसाई नगर, वारजे,

पुणे ४११०५८, महाराष्ट्र, भारत

कार्यालय – ०२०–२५२३१६६१

ई–मेल – baif@baif.org.in वेबसाईट – www.baif.org.in

# शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी स्वयंशिक्षण पुस्तिका संच कशासाठी?

भारतीय शेतकरी अनेक आव्हानांना तोंड देत असले, तरी गेल्या दशकात कृषी क्षेत्राला महत्वपूर्ण गती मिळाली आहे. शेतकऱ्यांना संघटित करणारी शेतकरी संस्था (एफपीओ), ही धोरणकर्त्यांनी आणि अभ्यासकांनी, शेतकरी समृद्धीसाठी सगळ्यात जास्त प्राधान्य दिलेली संस्थात्मक रचना म्हणून उदयास आली आहे. 'शेतकरी संस्था' हे पुढील पाच वर्षांत भारतातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट करणारे अत्यंत महत्वाचा घटक ठरणारे धोरण आहे. भारतातील विविध संस्थांद्वारे जवळपास ५००० शेतकरी संस्थांना पाठबळ देण्यात आले आहे आणि बऱ्याच नवीन शेतकरी संस्था स्थापन केल्या जात आहेत. तेलगू भाषिक आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यात सुमारे ७०० शेतकरी संस्था आहेत. 'शेतकरी संस्था' चळवळ अजूनही प्राथमिक टप्प्यावर आहे, ज्यामध्ये शेतकरी संस्था संचालक मंडळ त्यांच्या प्रवर्तकांवर अवलंबून असते. संचालक मंडळाची स्वतःची दूरदृष्टी, व्यवसायाभिमुखता आणि क्षमता, मर्यादित असते कारण त्यांना दिले जाणारे प्रशिक्षण मर्यादित आहे. शेतकरी संस्थेसमोर बरीच आव्हाने आहेत जसे की, चांगल्या प्रशिक्षित आणि वचनबद्ध मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा अभाव, सुशासन, व्यवसायाचे व्यवस्थापन, प्रभावी व्यवस्था, वित्त आणि बाजारपेठेतील प्रवेश या घटकांची आव्हाने, तर सरकारी योजनांविषयीची अपुरी माहिती यासारख्या अनेक गोष्टींनाही सामोरे जावे लागत आहे. कृषी मूल्य साखळी विकासावर लक्षणीय रितीने प्रभाव पाडण्याची क्षमता शेतकरी संस्थासाठी फारच दूरची बाब आहे.

शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची पात्रता आणि क्षमता वाढवणे हे शेतकरी संस्थेच्या यशासाठी अत्यंत, गरजेचे आहे ज्यायोगे शेतीपासून नफा वाढविण्यासाठी तसेच सदस्य शेतकऱ्यांना आवश्यक असणारी सेवा देणारी व्यावसायिक संस्था म्हणून त्या विकसित होऊ शकतील. शेतकरी संस्था अध्यापन केंद्राच्या माध्यमातून शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाला सतत प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे, एपीएमएएससाठी प्राधान्याची गोष्ट आहे, कारण आपण मोठ्या प्रमाणात शेतकरी संस्थांना पाठबळ देण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि इतरांनी पाठबळ देवू केलेल्या शेतकरी संस्थांना मार्गदर्शन देत आहोत, ज्यायोगे योग्य कृषी मूल्य साखळी विकास उपक्रमांमध्ये त्या उपयुक्त ठरतील.

शेतकरी संस्थेवरील विद्यमान प्रशिक्षण पुस्तिका आणि अभ्यास संचांचा आढावा घेतल्यास, आम्हाला शेतकरी संस्था संचालक मंडळासाठी उच्च गुणवत्तेचे, व्यावहारिक आणि वापरासाठी सोपी स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका नसण्याची मोठी उणीव आढळली. स्वयंसहायता संस्थांच्या स्वयंनियमन विषयावरील स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच विकसित करण्याच्या आपल्या प्रचंड अनुभवावर आणि संस्था बांधकाम प्रशिक्षणातील १८ वर्षांच्या अनुभवाच्या आधारे श्री मधू मूर्ती आणि श्रीमती रामलक्ष्मी यांच्या नेतृत्वाखाली एपीएमएएस संघाच्या सहकार्याने एक वर्षाहून अधिक काळ काम करून, संसाधन संस्था, भागीदार

स्वयंसेवी संस्था, प्रशिक्षण संस्था आणि शेतकरी संस्थेचे प्रतिनिधी यांच्या साहाय्याने शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी १२ सुलभ वापर स्वयंअभ्यास पुस्तिका संच विकसित केला आहे. या संचामध्ये शेतकरी संस्थेची आवश्यकता आणि महत्त्व, संस्थात्मक रचना, सभासदत्व, नेतृत्व आणि शासन, व्यवस्थापन, नोंदणी आणि कायदेशीर अनुपालन, व्यवसाय नियोजन, उत्पादकता वर्धन, सामूहिक खरेदी विक्री (निविष्ठा आणि उत्पादन), शेती विषयक सेवा केंद्रांचे व्यवस्थापन, लेखा आणि वित्तीय व्यवस्थापन इत्यादींचा अंतर्भाव आहे.

शेतकरी संस्था ह्या नेहमीच लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या स्वायत्त व्यावसायिक संस्था असतात. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची आणि पदाधिकाऱ्यांची क्षमता वाढवण्याची सतत आवश्यकता असते कारण नियमित निवडणुकीमुळे त्याच्यात बदल होत असतो. आम्हाला खात्री आहे की हे वापरण्यास सुलभ असे स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच शेतकरी संस्थांना त्यांच्या सदस्यांसाठी व्यवहार्य संस्था बनविण्यासाठी सक्षम करतील. स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच शिकण्यासाठी शेतकरी संस्थेच्या प्रवर्तकांना पद्धतशीरपणे शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. शेतकरी संस्थेचे प्रवर्तक आणि इतर भागधारक यांच्यासाठीही शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संचाचा प्रभावीपणे वापर करता येईल ज्यायोगे शेतकरी संस्थेच्या स्वयं–व्यवस्थापित आणि व्यवहार्य व्यवसाय संस्था होण्यासाठी सक्षम बनतील. एपीएमएएसने तेलगू आणि इंग्रजीमध्ये या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच तयार करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, परंतु आवश्यकतेप्रमाणे या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संचांचे संसाधन संस्था, राज्य सरकारे, नाबार्ड आणि प्रशिक्षण संस्था योग्य प्रकारे इतर भारतीय भाषांमध्ये रुपांतर करू शकतात. एपीएमएएस अशा प्रयत्नांना नक्कीच पाठिंबा देईल. ह्या पुस्तिकांचे मराठी भाषांतर करण्यासाठी बाएफ संस्था, पुणे आणि श्री. शिरीष जोशी, श्री. गिरीश जोशी, पुणे यांनी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल मनपूर्वक आभार! आपल्या अभिप्रायासाठी आम्ही खूप उत्सुक आहोत.

आपला

**सी. एस. रेड्डी**

मुख्य कार्यकारी अधिकारी

एपीएमएएस

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी स्वयंशिक्षण पुस्तिका संच कशासाठी ? | | ३ |
| ह्या पुस्तिकेसंबंधी | | ६ |
| परिभाषा / लघुरूपे | | ८ |
| सुरुवात करण्यापूर्वी | | ११ |
| १ | शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी | १२ |
| २ | शेतकरी संस्थेची कामकाज यंत्रणा | १५ |
| ३ | भूमिका व जबाबदाऱ्या | २१ |
| वाचन साहित्य | | ३४ |
| स्वयंमूल्यमापन | | ४० |

# ह्या पुस्तिकेसंबंधी

**संचालकांसाठी अभ्यास पुस्तिका संच**

१. शेतकरी संस्था : परिचय आणि गरज
२. शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना
३. शेतकरी संस्थेचे सभासदत्व
४. शेतकरी संस्थेमधील शासन
५. शेतकरी संस्थेचे व्यवस्थापन
६. शेतकरी संस्थेच्या कायदेशीर बाबीची पूर्तता
७. व्यवसाय योजना
८. लेखा आणि वित्त
९. कापणी नंतरचे मूल्य साखळी व्यवस्थापन
१०. विपणन
११. उत्पादकता वृद्धी सेवा
१२. नेतृत्व

**शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना :** शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांसाठी असलेल्या स्वयंशिक्षण पुस्तिकेच्या मालिकेतील दुसऱ्या क्रमांकाची पुस्तिका आहे. ही पुस्तिका शेतकरी संस्थेच्या संस्थात्मक बांधणीशी संबंधित आहे.

## उद्देश

या पुस्तिकेचा हेतू शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळ सदस्यांना आवश्यक ज्ञान घेण्यास सक्षम बनविणे आहे जेणेकरून ते प्रभावीपणे आपली भूमिका बजावू शकतील आणि त्यांच्या शेतकरी संस्थांना चैतन्यपूर्ण आणि त्यांच्या सदस्यांसाठी उपयोगी बनण्यांस मदत करेल.

**लक्ष्यगट** : ही पुस्तिका संच शेतकरी उत्पादक संघटनांच्या संचालक मंडळाच्या सदस्यांसाठी आहे. संचालक मंडळ सदस्यांना त्यांची शेतकरी संस्था चालविण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असावा.

## शिकण्याचे उद्दिष्ट

संस्थात्मक बांधणी आणि रचनेवरील या अभ्यासक्रमाची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

* शेतकरी संस्थेसाठी योग्य संस्थात्मक अभ्यास–क्रमाविषयी समजून घेणे
* शेतकरी संस्थेच्या विविध कार्यांबद्दल आणि त्यांच्यातील परस्पर संबंधांबद्दल समजून घेणे

* शेतकरी संस्थेच्या वेगवेगळ्या कार्यकारिणींच्या भूमिकेबद्दल माहिती करून घेणे जेणेकरुन कार्यकर्त्यांद्वारे केल्या जाणाऱ्या संबंधित भूमिकांची कार्यक्षमता सुनिश्चित केली जाईल

## रचना आणि सामग्री

ही अभ्यास पुस्तिका शेतकरी संस्थेच्या संस्थात्मक रचनेपासून सुरू होते आणि नंतर शेतकरी संस्थेच्या वेगवेगळ्या कार्यकर्त्यांबद्दल म्हणजे सदस्य, संचालक मंडळाचे सदस्य, कर्मचारी आणि त्यामधील परस्पर संबंधांबद्दल माहिती देते. त्यानंतर शेतकरी संस्थेच्या वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेच्या महत्त्वपूर्ण बाबींबद्दल माहिती देते.

## पुस्तिका कशी वापरावी

संचालक मंडळाचे सदस्य हा अभ्यास संच स्वतः वापरु शकतात किंवा बाहेरील व्यक्तींकडून शिकण्याची सोय करू शकतात. या संचांसोबत, योग्य त्या ठिकाणी या अभ्यास संचा संबंधित फलक आहेत जे संचालक मंडळाचे सदस्य, शिक्षणासाठी कामाच्या ठिकाणी प्रदर्शित करू शकतात.

आम्ही अपेक्षा व्यक्त करतो कि आपण या अभ्यासक्रमाच्या शिक्षणाचा आनंद घ्याल आणि आपल्या शेतकरी संस्थेचे अधिक प्रभावी आणि कार्यक्षम पद्धतीने व्यवस्थापन कराल.

# परिभाषा / लघुरूपे

**घटना (एओए)** : सहकारी संस्थेसाठीच्या नियमावली प्रमाणे शेतकरी उत्पादक कंपनीसाठी आर्टिकल्स ऑफ असोसिएशन (एओए) आहेत. ही घटना कंपनीच्या संचालनाचे नियम स्पष्ट करते आणि कंपनीचे उद्दीष्ट आणि हेतू साध्य करण्याचे मार्ग स्पष्ट करते.

संचालक मंडळाला घटना तयार करावी लागेल आणि त्यांला कंपनी रजिस्ट्रारकडून मान्यता घ्यावी लागेल. घटनेमध्ये दुरूस्ती केल्यास ती दुरुस्ती कंपनी रजिस्ट्रारकडून मंजूर करून घ्यावी लागेल.

**बोर्ड / संचालक मंडळ (बीओडी)** : धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता संचालक मंडळ ही शेतकरी संस्थेची प्रशासकीय समिती आहे. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची स्थापना सर्वसाधारण सभा अर्थात शेतकरी संस्थेच्या सदस्यांद्वारे निवडलेल्या प्रतिनिधींद्वारे केली जाते.

**नियमावली** : नियमावली ही सहकारी संस्थेचे कार्य सक्षम करण्यासाठीचा नियमांचा एक संच आहे. प्रत्येक सहकारी संस्थेची स्वतःची नियमावली असते आणि सहकारी संस्थेची सर्व कामे त्या नियमावली च्या कक्षेत करावी लागतात.

संचालक मंडळाला घटना तयार करावी लागते आणि त्या नियमावलीला सहकार निबंधकांकडून मंजूरी घ्यावी लागते. नियमावलीत कोणतीही सुधारणा केवळ सर्वसाधारण सभेद्वारेच केली जाऊ शकते आणि सहकार निबंधकांकडून त्याला मंजुरी घ्यावी लागेल.

**सहकारी संस्था** : सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत शेतकरी संस्थेला (उदा. महाराष्ट्र सहकारी कायदा १९६०) सहकारी संस्था म्हणतात.

**मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापक / महाव्यवस्थापक** : प्रत्येक शेतकरी संस्थेकडे पूर्ण वेळ मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी) किंवा हुद्दा कोणताही असो (व्यवस्थापक, महाव्यवस्थापक इ.) असणे आवश्यक आहे. मंडळाची सर्वसाधारण देखरेख, दिशानिर्देश आणि नियंत्रणाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी शेतकरी संस्थेच्या कामांचे व्यवस्थापन करतील आणि शेतकरी संस्थेच्या कामगिरीसाठी जबाबदार असतील.

**लाभांश** : लाभांश म्हणजे शेतकरी संस्थेच्या नफ्यातून त्यांच्या सदस्यांना वितरित केले जाते.

**एफपीओ (शेतकरी संस्था )** : शेतकरी संस्था ही एक नोंदणीकृत संस्था आहे जी तिच्या शेतकरी सदस्यांच्या मालकीची आणि नियंत्रणाखाली असते शेतकरी संस्थेचा उद्देश तिच्या सदस्यांना आवश्यक सेवा देऊन त्यांच्या सामूहिक गरजा भागविणे हा आहे. शेतकरी संस्था शेती आणि संबंधित क्षेत्रात वेगवेगळ्या कामांमध्ये सहभागी होतात. शेतकरी संस्था ही औपचारिक संस्था असल्याने तिचे कार्यालय आणि त्याला पायाभूत सुविधा, कर्मचारी, यंत्रणा असणे आवश्यक आहे आणि संचालक मंडळाने ती संस्था नियंत्रित केली पाहिजे. या पुस्तिकेमध्ये एफपीओला शेतकरी संस्था असा शब्द वापरला आहे.

**फेडरेशन** : फेडरेशन म्हणजे विशिष्ट स्तरावर (गाव समूह, प्रांत, तालुका, जिल्हा इ) असलेले उच्चतम शेतकरी संस्था ज्यात समान व्यवसायातील विविध लहान शेतकरी संस्था (प्राथमिक) सदस्य असतात.

**जनरल बॉडी** : शेतकरी संस्थेच्या सर्व सदस्यांना त्या शेतकरी संस्थेची सर्वसाधारण सभा असे संबोधले जाते. शेतकरी संस्थेमध्ये सर्वसाधारण सभा हीच सर्वोच्च अधिकार असते.

**सदस्य** : सदस्य म्हणजे शेतकरी संस्थेनी संमती दिलेली एखादी व्यक्ती किंवा उत्पादक संस्था आणि अशा सदस्यत्वासाठी आवश्यक पात्रता असणारी असावी. शेतकरी संस्थेमध्ये केवळ त्यांच्या कार्यक्षेत्रातील पात्र शेतकरी किंवा उत्पादक संस्था (त्यांच्या बायलॉज / घटनेनुसार ) सदस्य होऊ शकतात.

**पदाधिकारी** : विशिष्ट जबाबदाऱ्यांकडे लक्ष देण्यासाठी संचालक मंडळाच्या सदस्यांमधून पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष इ. यांचा समावेश असतो.

**उत्पादक कंपनी** : कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी संस्थेला उत्पादक कंपनी म्हटले जाते. उत्पादक कंपनी म्हणजेच कंपनी कायदा २०१३ च्या कलम ५८१ ब मध्ये निर्दिष्ट केलेल्या हेतूने आणि निर्दिष्ट उपक्रम करणारी कॉर्पोरेट बॉडी, जी निर्माती कंपनी म्हणून नोंदणीकृत असणारी संस्था होय.

**आश्रयदाता** : शेतकरी संस्थेने त्याच्या सभासदांना तिच्या व्यवसायात सहभागी करून घेऊन सेवांचा वापर करणे.

**सहभागासाठीचा बोनस** : संरक्षण बोनस म्हणजे शेतकरी संस्थेने त्यांच्या अतिरिक्त उत्पन्नापैकी सदस्यांना त्यांच्या संरक्षणाच्या प्रमाणात दिलेली रक्कम.

# सुरुवात करण्यापूर्वी

ही पुस्तिका शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी आणि रचना याविषयाशी निगडित आहे.

या विषयावरील काही मूलभूत प्रश्न खाली दिले आहेत. चला या प्रश्नांची स्वत: उत्तरे देऊया. या चाचणीचा उद्देश हा संबंधित प्रश्नांवरील आपल्या सध्याच्या आकलनाचे मूल्यांकन करणे आणि अशाप्रकारे याबद्दल अधिक जाणून घेणे हा आहे.

१. शेतकरी संस्थेची फेडरेशन बनवू शकतात का?

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

२. शेतकरी संस्थेचे संचालक मंडळ सदस्य कोणाला जबाबदार असायला हवे?

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

३. शेतकरी संस्थेच्या कर्मचारीवर्गाला कोणाच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेल?

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

४. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या काय आहेत?


.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

# १

# शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेसाठी योग्य संस्थात्मक प्रारूप समजून घेणे**

### मुख्य आशय

१. शेतकरी संस्थेसाठी योग्य संस्थात्मक बांधणी
२. विविध स्तरांवर कार्य
३. फेडरेशनमधील सदस्यत्व

### प्रस्तावना


शेतकरी संस्थेच्या पहिल्या पुस्तिकेमध्ये आपण शेतीतील अडचणींचे प्रास्ताविक, पैलू व त्या अडचणींवर मात करण्यासाठी सामूहिक कृतीची आवश्यकता, अशा सामूहिक क्रियेसाठी एक प्रभावी संस्थात्मक व्यासपीठ म्हणून शेतकरी संस्था, शेतकरी संस्थेचा अर्थ आणि मुख्य वैशिष्ट्ये हे आपण पाहिले आहे.

वरील पार्श्वभूमीवर, आता आपण शेतकरी संस्था – संस्थात्मक तपशीलांमध्ये जाऊया का? शेतकरी संस्थेच्या संस्थात्मक तपशीलांविषयी जाणून घेण्यासाठी आपल्याला संस्थात्मक बांधणी, शेतकरी संस्थेचे वेगवेगळे पदाधिकारी आणि त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध आणि वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांच्या भूमिका पाहिल्या पाहिजेत. आता याकडे एकेक करून पाहूया.

### संस्थात्मक बांधणी

शेतकरी संस्थेसाठी अनेक संस्थात्मक बांधणी आवश्यक आहेत. तथापि या सर्वांची सुरुवात एका शेतकऱ्यापासून होते. लहान, अनौपचारिक शेतकरी गट (एफजी) असू शकतात. या शेतकरी गटामधून

प्राथमिक शेतकरी संस्था तयार होऊ शकतात. तसेच आवश्यक असल्यास योग्य पातळीवर या प्राथमिक शेतकरी संस्थेचे फेडरेशन स्थापन होऊ शकते. सदस्य एक तर वैयक्तिक शेतकरी किंवा नोंदणीकृत उत्पादक संस्था असू शकतात. इतर संभाव्य बांधणी म्हणजे वैयक्तिक शेतकरी स्वत: शेतकरी संस्था बनवतात.




**एफजी – शेतकरी गट; पीओ – उत्पादक संस्था (गाव / गाव समूहपातळी); एफपीओ – शेतकरी संस्था**

### विविध स्तरांवर कार्य

- ❋ फेडरेशन – प्रक्रिया, साठवण, विपणन; शेतकरी संस्थेसाठी वित्तपुरवठा; तांत्रिक दुवा
- ❋ एफपीओ – बियाणे उत्पादन, विविध निविष्ठा, विपणन, कृषीयंत्रणा
- ❋ एफजी – तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, शेतकरी मुक्त शाळा, विविध निविष्ठा

वरीलप्रमाणे देशामध्ये शेतकरी संस्थेच्या संस्थात्मक बांधणीचे बरेच प्रकार आहेत. तथापि, अनुभवावरून असे दिसून आले आहे की सर्वप्रकारच्या संस्थात्मक व्यवसायांमध्ये शेतकरी संस्थाही आहेत आणि या सर्वप्रकारच्या व्यवस्थांमध्ये यशस्वी होणे गरजेचे आहे. म्हणून एखाद्या शेतकरी संस्थेची योग्य संस्थात्मक बांधणी असल्यास, बांधणीच्या प्रभावी कार्यासाठी या सर्व बाबी निश्चित करणे देखील आवश्यक आहे.

कोणत्याही शेतकरी संस्थेच्या संस्थात्मक बांधणीला खालील दोन मूलभूत उद्दिष्टे पूर्ण करावी लागतात.

१. सदस्यांना कार्यक्षम सेवा वितरण

२. शेतकरी संस्थेच्या व्यवसायाची व्यवहार्यता सुनिश्चित करणे

## फेडरेशनमधील सदस्यता

फेडरेशन म्हणजे विशिष्ट स्तरावर (गाव, समूह, प्रांत, तालुका, जिल्हा इ) असलेले उच्चतम शेतकरी

संस्था ज्यात समान व्यवसायातील विविध लहान शेतकरी संस्था (प्राथमिक) सदस्य आहेत. उदाहरणार्थ, एखाद्या प्रदेशातील ग्रामीण स्तरावरील दुग्ध सहकारी संस्था एकत्र येऊन उच्चतम दुग्ध फेडरेशन निर्माण करू शकतात. दूध संकलन, गुणवत्ता तपासणी, देयके इत्यादी कामे ग्रामीण स्तरावरील दुग्ध सहकारी संस्था करतात. तर दूध शीतकरण, पॅकिंग, विपणन, तांत्रिक सहाय्य इत्यादी उपक्रम फेडरेशनद्वारे केले जातात.

**चर्चेसाठी प्रश्न** : शेतकरी संस्थांना फेडरेशनचे सदस्यत्व मिळू शकते का? कोणत्या उद्देशाने / सेवांसाठी शेतकरी संस्थेच्या फेडरेशनमध्ये सदस्य होऊ शकतात?

शेतकरी संस्था ही त्यांच्या भौगोलिक क्षेत्रात आणि तत्सम व्यवसाय क्षेत्रात कार्य करणाऱ्या फेडरेशनमध्ये सदस्यत्व घेऊ शकतात. खरंतर, फेडरेशन एक माध्यम आहे ज्याद्वारे शेतकरी संस्थेचे सहकारी / उत्पादक कंपन्यांमध्ये सहकार्याचे सिद्धांत प्रत्यक्षात आणू शकतात.

## फेडरेशनमधील सदस्यत्वाचे फायदे


- मोठी उलाढाल आणि ब्रँडिंगला आवश्यक असणाऱ्या उलाढाली करण्यासाठी सौदा करण्याचे सामर्थ्य
- बाजारपेठ, वित्त आणि तंत्रज्ञान मिळविण्याची क्षमता
- स्पर्धांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनवते
- भागीदारांचे अधिक चांगले व्यवस्थापन
- सरकारी कार्यक्रमांमध्ये चांगल्या पद्धतीने प्रवेश करण्यास सक्षम
- सभासदांसाठी प्रभावी व्यासपीठ म्हणून काम करू शकते
- भेटी आणि जागरूकता

**दिलेले काम :** आपल्या शेतकरी संस्थेच्या विद्यमान संस्थात्मक बांधणीवर चर्चा करूया आणि आवश्यक असल्यास त्यामध्ये सुधारणा करूया.

# २

# शेतकरी संस्थेची कामकाज यंत्रणा

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेच्या विविध कार्यांबद्दल आणि त्यांच्यातील परस्पर संबंधांबद्दल समजून घेणे**

## मुख्य आशय

१. शेतकरी संस्थेची कामकाज यंत्रणा
२. शेतकरी संस्थेमधील महत्त्वाचे पदाधिकारी आणि त्यांचे परस्परसंबंध
३. रचनेचे सूचक

## कामकाज यंत्रणा

चैतन्य शेतकरी संस्थेचे अध्यक्ष श्री शिवराम यांनी, श्रीमती बहराटी, अध्यक्षा, प्रतिभा शेतकरी संस्था, राज्यस्तरीय उत्कृष्ट शेतकरी संस्था पुरस्कार प्राप्त, यांना त्यांचे अनुभव सांगण्यासाठी शेतकरी संस्थेला भेट देण्याची विनंती केली. आज श्रीमती बहराटी हे मंडळाच्या सदस्यांशी संवाद साधण्यासाठी चैतन्य शेतकरी संस्थेला भेट देत आहेत.



ज्यावेळी श्रीमती बहराटी आल्या, तेव्हा चैतन्य शेतकरी संस्थेचे बोर्ड सदस्य त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी आधीच उपस्थित होते. ते त्यांच्याशी शेतकरी संस्थेच्या यशासाठी महत्त्वपूर्ण घटकांबद्दल चर्चा करण्यासाठी आले आहेत. चैतन्य शेतकरी संस्थेचे अध्यक्ष श्री. शिवाराम यांनी श्रीमती बहराटी यांचे स्वागत केले आणि त्यांची मंडळाच्या सर्व सदस्यांशी ओळख करून दिली. परिचय संपल्यानंतर संवाद सुरू झाला.

श्रीमती बहराटी ह्या गेल्या तीन वर्षांपासून प्रतिभा शेतकरी संस्थेच्या मंडळाच्या सदस्या म्हणून कार्यरत होत्या. गेल्या वर्षी त्यांची अध्यक्षपदीही निवड झाली. शेतकरी संस्थेच्या यशातील महत्त्वाच्या घटकांबद्दल त्या त्यांच्या व्यावहारिक अनुभवातून शिकल्या आहेत. त्या अनुभवी असल्यामुळे, त्या चैतन्य शेतकरी संस्थेच्या मंडळाच्या सदस्याशी संवाद साधण्यासाठी आल्या.

उपस्थित मंडळाच्या सदस्यांना संबोधित करताना त्यांनी त्यांच्या शेतकरी संस्थेबद्दल थोडक्यात माहिती दिली. आमचे सदस्य आवश्यक असलेल्या गणसंख्येपेक्षा कितीतरी जास्त संख्येने सर्वसाधारण सभेत नियमितपणे उपस्थित राहतात, निर्णय घेताना आणि मतदानामध्ये सक्रियपणे भाग घेतात, असेही त्यांनी नमूद केले. आमचे मंडळ सदस्यांच्या एकत्रितपणाने आवडीच्या विषयांचे प्रतिनिधित्व करते आणि आम्ही नियमितपणे सर्वसाधारण सभेत वेळोवेळी बैठक घेतो, आपल्या सदस्यांसमोर प्रगती सादर करतो आणि वार्षिक अहवाल सदस्यांना उपलब्ध करुन देतो.

आमच्या मंडळाचे सदस्य आमच्या सदस्यांना सातत्याने माहितीचे वाटप होत आहे याची खात्री करतात. आम्ही बैठकांची कार्यवृत्त पुस्तिका ठेवतो आणि आमचे सदस्य, मंडळाचे सदस्य इत्यादीसाठी उपलब्ध करून देतो. तसेच आमच्या शेतकरी संस्थेमध्ये अंतर्गत आणि वैधानिक लेखापरीक्षा नियमितपणे होतात आणि लेखापरीक्षांच्या शिफारशींचे पालन केले जाते.

श्री शिवाराम यांनी विचारले की जर मंडळाचे सदस्य मोठी जबाबदारी घेत असतील तर मग कर्मचाऱ्यांची भूमिका काय असते?


प्रत्युत्तरामध्ये श्रीमती बहराटी यांनी सांगितले की, कर्मचारी आमच्याद्वारे नियुक्त केले जातात आणि आम्हाला जबाबदार असतात. जोपर्यंत आम्ही त्यांना अधिकार देत नाही तोपर्यंत ते निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यांनी मंडळाच्या निर्देशानुसार आमच्या सदस्यांना दर्जेदार, वेळेवर आणि पुरेशा सेवा दिल्या पाहिजेत. कर्मचार्यांच्या मदतीने मंडळ सदस्यांपर्यंत सेवा पोहचवण्यासाठी आवश्यक त्या यंत्रणेची आणि व्यवसायाच्या नियमांची कार्यक्षमतेने स्थापना करतात.

## मुख्य पदाधिकारी आणि परस्परसंबंध

श्रीमती बहराटी यांनी हे लक्षात घ्यायला सांगितले की सदस्य, संचालक मंडळ व कर्मचारी हे कोणत्याही शेतकरी संस्थेमधील तीन घटक आहेत. शेतकरी संस्थेच्या यशासाठी या तिघांमधील परस्परसंबंध समजून घेणे आणि त्यांची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे.

त्यानंतर त्यांनी एक तक्ता सादर केला आणि तीन गटांमधील संबंध स्पष्ट करण्यास सुरवात केली.

### आकृती १ : शेतकरी संस्थेची कामकाज यंत्रणा




तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे, शेतकरी संस्थेमध्ये सदस्य (सर्वसाधारण मंडळ) सर्वोच्च असतात, जे मंडळाची निवड करतात. म्हणूनच मंडळाला सदस्यांच्या सामान्य हितासाठी पारदर्शक व जबाबदार पद्धतीने काम करावे लागते. कर्मचाऱ्यांची नेमणूक संचालक मंडळाद्वारे केली जाते आणि त्यामुळे ते संचालक

मंडळाला जबाबदार असतात. संचालक मंडळ कर्मचाऱ्यांसाठी कामगिरीची मानके ठरवते आणि त्यांना कामगिरीबद्दल बक्षीस देते.

आधी दर्शविल्याप्रमाणे, संचालक मंडळाच्या निर्देशानुसार सदस्यांना वेगवेगळ्या सेवा प्रदान करणे ही कर्मचाऱ्यांची प्राथमिक भूमिका आहे. त्याचबरोबर शेतकरी संस्थेद्वारे विविध सेवा देणे ही सदस्यांची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे.

## चांगल्या रचनेचे सूचक

नंतर श्रीमती बहराटी यांनी संचालक मंडळाच्या सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल बोलण्यासाठी आणि त्यांच्या शेतकरी संस्थेमध्ये योग्य ते परस्परसंबंध आणण्यासाठी सदस्य, संचालक मंडळ व कर्मचारी यांनी करायच्या उपक्रमांची यादी करण्यास सांगितले. शेवटी श्रीमती बहराटी असे म्हणाल्या कि शेतकरी संस्थेसाठी खालील निर्देशकांची खात्री करणे ही संचालक मंडळाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

**तक्ता १ : चांगल्या रचनेचे सूचक**

| कार्यकर्ता | सूचक |
|---|---|
| I. **सदस्य आणि संचालक मंडळ** | |
| १ | नियमावलीचा विकास आणि दुरुस्ती |
| २ | संचालक मंडळ निवडणुकीत नियमितता |
| ३ | वार्षिक अहवाल |
| ४ | लेखापरीक्षा |
| ५ | सर्वसाधारण मंडळाच्या नियमित आणि प्रभावी बैठका |
| ६ | योग्य लेखापालन |
| II. **संचालक मंडळ आणि कर्मचारी** | |
| १ | कर्मचारी भरती / मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | कर्मचाऱ्यांचे अहवाल देणे व कामगिरीचे मूल्यांकन करणे / मुख्य कार्यकारी अधिकारी |

| कार्यकर्ता | सूचक |
|---|---|
| ३ | वार्षिक योजना आणि कामगिरीचे सूचक |
| ४ | कामगिरीसंबंधी बक्षीस / शिक्षा |
| ५ | व्यवस्थापन प्रणाली |
| **III. सदस्य आणि कर्मचारी** | |
| १ | वेळेवर, दर्जेदार आणि आवश्यक सेवा |
| २ | सदस्यांद्वारे सेवांचा वापर |
| ३ | सभासद केंद्रस्थानी असणे |
| ४ | व्यवसाय योजना |
| ५ | व्यवसायाचे नियम |
| ६ | सेवासंच |

## स्वाध्याय:

शेतकरी संस्थेच्या संस्थात्मक बांधणी आणि सदस्य, संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांमधील संबंधांवरील चर्चेच्या आधारे, आपल्याला खालील परिस्थितींचे मूल्यांकन १ ते ५ च्या प्रमाणात करायचे आहे. दिलेल्या गुणांकाचे कारण स्पष्ट करणे देखील आवश्यक आहे.

१ – खूप खराब ; २ – खराब ; ३ – सरासरी ; ४ – चांगले ; ५ – खूप चांगले.

१. सहकारी संस्थेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्या (सीईओ) साठी कामांचे नियोजन ठरविण्यामध्ये आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्याच्या कामामध्ये संचालक मंडळाचा नियमितपणे सहभाग असतो.

१ – खूप खराब     २ – खराब     ३ – सरासरी     ४ – चांगले     ५ – खूप चांगले

स्पष्टीकरणः ______________________________

______________________________

______________________________

२. शेतकरी संस्थेमध्ये, अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी हातमिळवणी करतात, स्वतःच्या स्वार्थासाठी सर्व बाबींवर नियंत्रण ठेवतात आणि एकमेकांना उत्तरदायी राहतात.

१ – खूप खराब २ – खराब ३ – सरासरी ४ – चांगले ५ – खूप चांगले

स्पष्टीकरणः ____________________

____________________

____________________

____________________

३. शेतकरी संस्थेमध्ये, सदस्य कधीही इतर सेवा प्रदात्यांकडे वळत नाहीत कारण शेतकरी संस्थेचे कर्मचारी नेहमीच त्यांना आवश्यक आणि दर्जेदार सेवा वेळेत पुरवतात.

१ – खूप खराब २ – खराब ३ – सरासरी ४ – चांगले ५ – खूप चांगले

स्पष्टीकरणः ____________________

____________________


____________________

____________________

३

# भूमिका व जबाबदाऱ्या

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेच्या वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेबद्दल माहिती करून घेणे जेणेकरुन संबंधित भूमिकांची कार्यवाही सुनिश्चित केली जाईल**

### मुख्य आशय

१. भूमिका स्पष्टतेचे आणि भूमिका कार्यक्षमतेचे महत्त्व

२. सर्वसाधारण मंडळाचे अधिकार

३. संचालकांची भूमिका आणि जबाबदारी आणि दायित्व

४. मुख्य कार्यकारी अधिकारी / जीएमची भूमिका

५. संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी / जीएम यांच्या भूमिकांमधला फरक

६. अध्यक्षाची भूमिका व जबाबदारी

७. सचिवांची भूमिका व जबाबदारी

आधीच्या सत्रात आपण पाहिले की सदस्य, मंडळ आणि कर्मचारी हे शेतकरी संस्थेचे तीन प्रमुख कार्यकारी घटक आहेत. आता या सत्रात या घटकांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या पाहूया. आपल्या सर्वांना माहिती आहेच की आपल्या शेतकरी संस्थेसह कोणत्याही संस्थेच्या सुरळीत कामकाजासाठी भूमिका स्पष्ट असणे महत्वाचे आहे. आपल्या शेतकरी संस्थेच्या कामात कोणताही गोंधळ होणार नाही, यासाठी वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांना त्यांची भूमिका पार पाडली पाहिजे याची आपण खात्री करणे आवश्यक आहे.

म्हणून भूमिकेच्या स्पष्टतेबद्दल अधिक समजून घेण्यासाठी, मागील प्रकरण परत पुढे चालू करूया.

बहराटीजी, आता आम्हाला शेतकरी संस्थेचे सदस्य, संचालक मंडळ आणि कर्मचारी यांच्यात परस्पर संबंधांविषयी स्पष्टीकरण मिळाले. आमच्या सर्वसाधारण मंडळाने काही जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. त्या अनुषंगाने आम्ही शेतकरी संस्था कशी चालवावी? श्री शिवराम यांनी विचारले. श्रीमती बहराटी यांनी नमूद केले की, सर्व सदस्यांना एकत्रितपणे सर्वसाधारण मंडळ म्हटले जाते आणि त्यांना भाग घेण्याचा व मत मांडण्याचा समान अधिकार आहे. आवश्यकतेनुसार योजना आखून, अंमलबजावणीच्या पध्दतीचा आढावा घेणे इत्यादीसाठी वर्षातून एकदा सर्वसाधारण मंडळाची बैठक होणे अत्यावश्यक आहे.

जरी आपणा सर्वांना संचालक मंडळाबद्दल माहित असले तरी संचालक मंडळ काय आहे ते तुम्हाला समजावून सांगता येईल का? श्रीमती बहराटी यांनी विचारले. याला उत्तर देतांना श्री लक्ष्मण, जे मंडळाच्या सदस्यापैकी एक आहेत त्यांनी सांगितले की, शेतकरी संस्थेचे कामकाज चालविण्याच्या दृष्टीने, जे सदस्य सर्वसाधारण मंडळाद्वारे निवडले जातात त्यांना बोर्ड किंवा संचालक मंडळ म्हणून संबोधले जाते. शेतकरी संस्था चालविण्याची या मंडळाची जबाबदारी असते.

सर्वसाधारण मंडळाने निर्देशित केल्यानुसार आणि शेतकरी संस्थेने नोंदणी केलेल्या कायद्यानुसार आणि त्यांच्या पोटकलमांनुसार संचालक मंडळाला त्यांचे कर्तव्य बजावावे लागते. म्हणजे जे काही क्रियाकलाप ते करतात त्या सर्वसाधारण मंडळाच्या निदर्शनास आणून त्या सत्यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

शेतकरी संस्थेचा व्यवसाय चालविण्यासाठी, सर्वसाधारण मंडळ, संचालक मंडळ आणि कर्मचारी यांचे काही कर्तव्य आणि जबाबदाऱ्या असतात. जेव्हा आम्हाला तीन कार्यघटकांच्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांबद्दल स्पष्ट समज असेल, तेव्हाच आम्ही शेतकरी संस्था कार्यक्षमतेने चालवू शकतो आणि आपल्या सदस्यांचा विश्वास मिळवू शकतो. म्हणून श्रीमती बहराटी पुढे म्हणाल्या, शेतकरी संस्थेच्या तीन कार्यघटकांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांबद्दल आपण जाणून घेऊ या.

सर्वसाधारण मंडळाचे अधिकार खालील आकृतीमध्ये दर्शविले आहेत.


## सर्वसाधारण सभा

शेतकरी संस्थेशी संबंधित सर्व अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार फक्त सर्वसाधारण सभेकडे असतील.


### आकृती १ : सर्वसाधारण सभेचे अधिकार




संचालक मंडळाची निवडणूक




पोटकायदे / कलमांची दुरुस्ती




योजना, धोरणे आणि अर्थसंकल्प यांना मान्यता




वार्षिक अहवालास मान्यता आणि लेखापरीक्षण झालेली स्टेटमेंट्स




अतिरिक्त ऊर्जेची विल्हेवाट लावणे आणि तुटीचे व्यवस्थापन करणे




विशिष्ट राखीव निधी तयार करणे




लेखा परीक्षकांची नेमणूक

वर दिल्याप्रमाणे, सर्वसाधारण मंडळ सर्व आवश्यक अधिकारांसह सर्वोच्च आहे कारण ते शेतकरी संस्थेचे मालक आहे. दीर्घकालीन योजना, सर्वसाधारण सभेचा संचालक मंडळाच्या निर्णयांवर नकाराधिकार, शेतकरी संस्थेचे विघटन, मंडळाचे निर्णय नकोसा अधिकार वापरणे इत्यादी सर्व महत्त्वपूर्ण निर्णय घेणे हे सर्वसाधारण सभेचे सर्वोच्च अधिकार आहेत .

## संचालक मंडळाची भूमिका आणि जबाबदाऱ्या

खाली दर्शविल्याप्रमाणे संचालक मंडळाला अनेक अधिकार, जबाबदाऱ्या आणि दायित्व देखील देण्यात आले आहेत.

**आकृती २ : शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची भूमिका आणि जबाबदाऱ्या**



| प्रशासकीय | आर्थिक | वैधानिक |
|---|---|---|
| ✻ सभासदांची नोंदणी करणे तसेच रद्द करणे<br>✻ पदाधिकाऱ्यांची निवडणूक करणे तसेच पदावनत करणे<br>✻ धोरणे आणि योजना बनवणे<br>✻ कार्य समित्या / उपसमित्यांची स्थापना<br>✻ कर्मचाऱ्यांची नेमणूक व त्यांच्या कामगिरीचा आढावा<br>✻ प्रगतीचा नियमित आढावा<br>✻ इतर संस्था, संघटना आणि फेडरेशनची सदस्यता घेणे | ✻ निधी जमा करणे<br>✻ निधीचा उपयोग<br>✻ निधी आणि मालमत्ता सुरक्षित ठेवणे<br>✻ बँक खात्याची देखभाल<br>✻ लेखा पुस्तकांची देखभाल<br>✻ अतिरिक्त शिलकीचे वाटप<br>✻ जोखीम व्यवस्थापन | ✻ निवडणुकांचे आयोजन करणे<br>✻ हिशोबाचे लेखापरीक्षण<br>✻ वार्षिक विवरणपत्रे भरणे<br>✻ घटनेमध्ये मध्ये सुधारणा<br>✻ बैठकांचे आयोजन – सर्वसाधारण मंडळ व संचालक मंडळ |

# मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापकाची भूमिका

शेतकरी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापकाची भूमिका आणि जबाबदाऱ्या खाली दिल्या आहेत.

## १. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळास जबाबदार व उत्तरदायी असणे



- उद्देश, योजना आणि धोरणे तयार करण्यात मंडळाला मदत करणे
- मंडळाच्या निर्देशानुसार मंडळाची बैठक, सर्वसाधारण सभा, लेखापालन, लेखापरीक्षा, वार्षिक परतावा इत्यादी विविध कायदेशीर अनुपालनाची खात्री करणे
- मंडळ व बाह्य अर्थसाह्य देणाऱ्या संस्थांना आवश्यक असणारे सर्व अहवाल सादर करणे
- शेतकरी संस्थेचे दैनंदिन कामकाज चालवणे
- मंडळामार्फत सोपविली जाणारी अशी इतर कार्ये पूर्ण करणे

## २. संचालक मंडळाच्या ढोबळ मार्गदर्शनाखाली सदस्यांना सेवा




* शेतकरी संस्थेच्या व्यवसायासाठी आणि सदस्यांच्या कल्याणाच्या संधी शोधणे, व्यवसायाची योजना तयार करून तिची अंमलबजावणी करणे.
* मंडळाच्या निर्देशानुसार सदस्यांना वेगवेगळ्या सेवा पुरवणे.
* सभासदांना माहिती, प्रशिक्षण आणि परिचय
* शेतकरी संस्थेसाठी संसाधन (आर्थिक, तांत्रिक) प्राप्त करणे
* शेतकरी संस्थेसाठी वेगवेगळ्या आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती /उपलब्धता निश्चित करणे

## ३. संस्थात्मक प्रणाली आणि अंमलबजावणी



- योग्य लेखा पालन ठेवणे; वार्षिक हिशोब तयार करणे आणि त्याचे लेखापरीक्षण करणे; मंडळासमोर आणि सदस्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत लेखापरीक्षित हिशोब मांडणे
- मंडळाच्या निर्देशानुसार कर्मचाऱ्यांची भरती करणे आणि त्यांच्या कामगिरीवर लक्ष ठेवणे
- शेतकरी संस्था – लेखा आणि लेखा पालन, देखरेख आणि अहवाल, उत्पादन, विपणन, प्रशासन, मनुष्यबळ विकास इत्यादीमध्ये संबंधित प्रणाली निर्माण करणे आणि अंमलबजावणी
- अर्थसहाय्य संस्था,भागीदार आणि सरकारी संस्था यांच्याशी योग्य संबंध

## भूमिकांमधील फरक

नंतर श्रीमती बहराटी यांनी नमूद केले की, आधी चर्चा केल्याप्रमाणे मंडळाचे सदस्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी / जीएम यांच्या भूमिकेतील फरक समजून घेणे महत्वाचे आहे. कारण हे अवघड आहे आणि प्रसंगी, या भूमिकेच्या स्पष्टतेच्या अभावामुळे त्यांच्या प्रभावी कार्यावर परिणाम होतो. म्हणून, संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी / जीएम यांच्या भूमिकेतील फरक पाहूया.



**तक्ता : भूमिकेतील फरक**







| संचालक | मुख्य कार्यकारी अधिकारी / जीएम |
|---|---|
| १ दिशा दाखवणे | १. संचालक मंडळाच्या निर्देशानुसार कार्य करणे |
| २ धोरणात्मक दिशानिर्देश | २. कार्यान्वयन दिशानिर्देश |
| ३ संस्थात्मक धोरणे स्थापन करणे | ३ संस्थात्मक धोरणे कार्यान्वित करणे |
| ४ सर्वसाधारण मंडळाला अहवाल सादर करणे | ४ संचालक मंडळाला अहवाल सादर करणे |
| ५ सदस्यांसाठी आवश्यक सेवानिश्चित करणे | ५ सदस्यांना निश्चित केलेल्या सेवा प्रदान करणे |
| ६ मुख्य कार्यकारी अधिकारी / जीएम यांच्या कामगिरीचा आढावा घेणे | ६. मंडळाने निर्देशित केल्यानुसार अन्य कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचा आढावा घेणे |

थोडक्यात, संचालक धोरणे, दिशा आणि योजना ठरवतात तर कर्मचाऱ्यांना त्यांची अंमलबजावणी करून त्यांचा अहवाल मंडळाला सादर करावा लागतो.




## स्वाध्याय:

पुढील प्रत्येक क्रियाकलापांसाठी, कोणाची जबाबदारी आहे याच्या योग्य चौकटीवर खूण करा.

| कार्य | सर्वसाधारण सभासदस्य | संचालक मंडळ | कर्मचारी |
|---|---|---|---|
| **१. सदस्यांना प्रवेश**   | | | |
| **२. सर्वसाधारण सभेच्या बैठकांचे आयोजन करणे**  | | | |
| **३. लेखापरीक्षकांची नेमणूक**  | | | |

| कार्य | सर्वसाधारण सभासदस्य | संचालक मंडळ | कर्मचारी |
|---|---|---|---|
| ४. मंडळाच्या सदस्यांची निवड करण्यासाठी मतदान  | | | |
| ५. वार्षिक योजनांना मान्यता देणे   | | | |
| ६. लेखापरीक्षण केलेल्या आर्थिक विवरणपत्रांना मान्यता देणे  | | | |

| कार्य | सर्वसाधारण सभासदस्य | संचालक मंडळ | कर्मचारी |
|---|---|---|---|
| ७. वार्षिक विवरण पत्रे भरणे  | | | |
| ८. कायदेशीर अंमलबजावणी  | | | |
| ९. लेखापुस्तकांची योग्य देखभाल  | | | |
| १०. सदस्यांना निविष्ठा पुरवठा करणे  | | | |

| कार्य | सर्वसाधारण सभासदस्य | संचालक मंडळ | कर्मचारी |
|---|---|---|---|
| ११. सदस्यांच्या उत्पादनांचे विपणन   | | | |
| १२. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक  | | | |
| १३. शेतकरी संस्थेची धोरणे ठरवणे  | | | |

## वैयक्तिक स्व–मूल्यांकन:

अपेक्षित भूमिकेच्या आधारे आपण स्वतंत्रपणे स्वत:चे मूल्यांकन करूया आणि आपण आपली भूमिका पार पाडण्यास कोणत्या मर्यादेपर्यंत सक्षम आहोत हे ओळखूया. आवश्यक सुधारणा देखील करूया जेणेकरुन आपण आपली भूमिका पूर्णपणे पार पाडू शकू.



# वाचन साहित्य

## कंपनी कायदा २०१३

कंपनीमधील सदस्यांचे अधिकार : सदस्य सर्वसाधारण सभेद्वारे कार्य करतात आणि सभा हे करू शकतेः

१. अर्थसंकल्प मंजूर करणे आणि कंपनीची वार्षिक लेखपत्रके स्वीकारणे

२. रोखलेल्या किंमतीचे प्रमाण मंजूर करणे

३. संरक्षण बोनस मंजूर करणे

४. बोनस समभाग जारी करण्यास मान्यता देणे

५. लेखापरीक्षकाची नेमणूक करणे

६. लाभांश जाहीर करणे आणि त्याच्या वितरणावर निर्णय घेणे

७. घटनेमध्ये (AOA) आणि अनुच्छेदामध्ये सुधारणा करणे

८. मंडळाद्वारे कोणत्याही संचालकांना दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या अटी व मर्यादा निर्दिष्ट करणे; आणि

९. सदस्यांद्वारे निर्णयासाठी अनुच्छेदात राखीव असलेल्या इतर कोणत्याही गोष्टींना मान्यता देणे किंवा त्यावर कार्य करणे.

## संचालक मंडळाचे अधिकार व कार्ये (कंपनी कायदा २०१३)

१. देय लाभांश निश्चित करणे

२. रोखलेल्या किंमतीचे प्रमाण निश्चित करणे आणि सर्वसाधारण सभेमध्ये अनुमोदन देण्याची शिफारस करणे

३. नवीन सदस्यांची भरती

४. संस्थात्मक धोरणे, उद्दीष्टे आणि ती आखणे, यांचा पाठपुरावा करणे विशिष्ट दीर्घकालीन आणि वार्षिक उद्दीष्टे स्थापित करणे आणि कॉर्पोरेट रणनीती आणि वित्तीय योजना मंजूर करणे

५. घटनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उत्पादक कंपनीच्या अशा इतर अधिकाऱ्यांची नेमणूक करणे

६. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि त्याद्वारे नियुक्त केलेल्या इतर अधिकाऱ्यांना निर्देश देणे आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे

७. योग्य लेखापुस्तके ठेवणे; लेखापरीक्षकाच्या अहवालासह वार्षिक सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यासाठी वार्षिक लेखा तयार करणे आणि असल्यास, लेखापरीक्षकाने केलेल्या अर्हतेवरील उत्तरे तयार ठेवणे

८. उत्पादक कंपनीच्या सामान्य व्यवसायात मालमत्ता संपादन करणे किंवा विल्हेवाट लावणे

९. सामान्य व्यवसायात उत्पादक कंपनीच्या पैशाची गुंतवणूक करणे

१०. संचालक किंवा त्याचा नातेवाईक नसलेल्या कोणत्याही सदस्याला उत्पादक कंपनीच्या व्यवसायविषयक कामकाजासंबंधात कोणतेही कर्ज किंवा आगाऊ रक्कम मंजूर करणे

११. कार्ये करण्यासाठी किंवा त्याच्या अधिकारांच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या अशा इतर उपाययोजना किंवा इतर कृती करणे

## कंपनी कायदा २०१३ : संचालकांची दायित्वे

(१) जेव्हा संचालक ठरावासाठी मतदान करतात किंवा इतर कोणत्याही मार्गाने मंजूर करतात, या कायद्यातील तरतुदींचे किंवा सध्या अस्तित्त्वात असलेल्या किंवा अनुच्छेदात अस्तित्त्वात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्याचे उल्लंघन करून काहीही करतात, तेव्हा ते संयुक्तपणे आणि वैयक्तीकपणे उत्पादक कंपनीला होणाऱ्या कोणत्याही तोट्यासाठी किंवा नुकसानासाठी जबाबदार असतील.

(२) पोट–कलम (१) मधील तरतुदींचा पूर्वग्रह न ठेवता उत्पादक कंपनीला तिच्या संचालकांकडून वसूल करण्याचा अधिकार असेल –

(a) उप–कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या उल्लंघनाच्या परिणामी अशा संचालकाने कोणताही नफा कमविला असेल तर अशा नफ्याइतकी रक्कम;

(b) जर उल्लंघन केल्यामुळे उत्पादक कंपनीचा तोटा किंवा नुकसान झाले आहे, तर त्या तोट्याच्या किंवा नुकसानीच्या एवढी समान रक्कम; ९६

(३) या कायद्यान्वये किंवा काही अंमलबजावणीसाठी कोणत्याही इतर कायद्यानुसार संचालकांवर निश्चित केलेले उत्तरदायित्व हे या कलमांतर्गत लादलेल्या जबाबदारीच्या व्यतिरिक्त असेल आणि त्यांचा अपमान करण्यासाठी नाही.

## अध्यक्षांची भूमिका व जबाबदाऱ्या :

१. सर्वसाधारण व विशेष बैठकीचे अध्यक्षपद भूषविणे आणि बैठकीच्या कार्यांची देखरेख करणे

२. शेतकरी संस्थेची कार्यवाही मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रभावी आणि कार्यक्षमतेने पार पाडली जात आहे आणि त्यासाठी आवश्यक ती कृती होत आहे याची नेहमी माहिती व जाणीव ठेवणे

३. सदस्यांच्या सर्वसाधारण आणि विशेष बैठकीत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे

४. संचालक मंडळाच्या बैठकीत घेतलेले निर्णय अंमलात आणणे

५. कायदेशीर अनुपालनासह शेतकरी संस्थेच्या सर्व बाबींवर देखरेख ठेवणे

६. शेतकरी संस्थेच्या कर्मचाऱ्यांवर देखरेख ठेवणे

७. शेतकरी संस्थेची प्रगती निर्देशित करणे आणि त्याच्या कार्यवाहीची योजना बनविणे

८. बाह्य जगात शेतकरी संस्थेचे प्रतिनिधित्व करणे

९. शेतकरी संस्थेमध्ये कामासाठी पोषक वातावरण तयार करणे आणि ते वातावरण राखणे

१०. सेक्रेटरी मार्फत सदस्य / कर्मचाऱ्यांच्या तक्रारी समजून घेणे, त्यांचे निराकरण करणे, त्यावर निर्णय घेणे आणि कृती करणे

११. शेतकरी संस्थेच्या हिताचे रक्षण करणे आणि तिच्या निरोगी वाढीसाठी आवश्यक ती सर्व कामे पार पाडणे

## सचिवाची भूमिका व जबाबदाऱ्या:

१. शेतकरी संस्थेकडून दिल्या जाणाऱ्या सर्व पावत्या, कागदपत्रे, इतर महत्त्वपूर्ण कागदपत्रे, प्रमाणपत्रे इत्यादींवर अधिकृत स्वाक्षरीकर्ता म्हणून स्वाक्षरी करणे

२. शेतकरी संस्थेची सर्वसाधारण व विशेष बैठक, मंडळाच्या बैठका, कार्यकारी समिती / उपसमित्यांच्या बैठका बोलावणे व त्यांचे आयोजन करणे, बैठकांना उपस्थित राहणे, या बैठकांची उपस्थिती नोंदवणे, बैठकांचे इतिवृत्त तयार करणे आणि त्यावर अध्यक्षांची सही घेणे व ती संबंधित व्यक्तींकडे पाठवणे, बैठकांमध्ये घेतलेल्या निर्णयांचा पाठपुरावा करुन त्यांची अंमलबजावणी करणे.

३. कायदेशीर अनुपालन वेळेत होते आहे याची खात्री करणे

४. शेतकरी संस्था , कायदेशीर आणि नियामक प्राधिकरणाच्या सदस्यांना आवश्यक असलेली सर्व प्रकारची माहिती एकत्रित करणे आणि प्रदान करणे

५. शेतकरी संस्थेच्या सर्व व्यवहारांमध्ये तिचे हित संरक्षित करणे

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची कार्ये (कंपनी कायदा २०१३)

१. उत्पादक कंपनीचे रोजचे कामकाज हाताळण्यासह नियमानुसार प्रशासकीय कामे करणे

२. बँक खाती संचालित करणे किंवा कोणत्याही व्यक्तीस अधिकृत करणे, मंडळाच्या सर्वसाधारण किंवा विशेष मंजूरीच्या अधीन राहून, बँक खाते चालविणे

३. उत्पादक कंपनीची रोख रक्कम व अन्य मालमत्ता सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करणे

४. कंपनीकडून मंडळाने अधिकृत केलेल्या कागदपत्रांवर सही करणे

५. योग्य लेखानोंदी ठेवणे; वार्षिक लेखे तयार करणे आणि त्याचे लेखापरीक्षण करणे; मंडळासमोर आणि सदस्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत लेखापरीक्षित लेखे ठेवणे

६. उत्पादक कंपनीच्या कार्याचे आणि कार्यपद्धतीची माहिती देण्यासाठी सभासदांना नियमित माहिती पुरविणे

७. मंडळाने त्याला दिलेल्या अधिकारांनुसार पदांवर नेमणुका करणे

८. ध्येय, उद्दिष्टे, योजना आणि धोरणे तयार करण्यात मंडळाला मदत करणे

९. प्रस्तावित व चालू असलेल्या कामांविषयी कायदेशीर व नियामक बाबींसंदर्भात मंडळाला सल्ला देणे व त्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करणे

१०. सामान्य व्यवसायात आवश्यक असलेल्या अधिकारांचा वापर करणे

११. जी मंडळाने सोपविले आहे अशी इतर कार्ये पार पाडणे आणि अशा इतर अधिकारांचा उपयोग करणे

# स्वयंमूल्यमापन

आता आपण शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी आणि रचना या पुस्तिकेच्या समाप्तीकडे आलो आहोत. कृपया हे आठवा कि अभ्यासाच्या सुरूवातीस आपण याविषयावरील काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे दिली.

आता आपण वरील विषयाच्या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या टप्प्यावर आलो आहोत.

या शेवटच्या टप्प्याचा उद्देश असा आहे की वरील पाठ्यक्रमामुळे वाढलेल्या ज्ञानासंदर्भात स्वत: चे मूल्यांकन करणे.

तर आपण अभ्यासक्रमावरील आपल्या शिक्षणावर आधारित आणखी काही प्रश्नांची उत्तरे देऊ.

**१. सर्वसाधारण मंडळाचे कोणते अधिकार आणि कार्ये आहेत ?**

........................................................................................................
........................................................................................................
........................................................................................................
........................................................................................................

**२. कोणाला शेतकरी संस्थेमधील सदस्यांना सेवा द्यायची आहे ?**

........................................................................................................
........................................................................................................
........................................................................................................
........................................................................................................

**३. शेतकरी संस्थेच्या संचालकांची काय दायित्वे आहेत ?**

........................................................................................................
........................................................................................................
........................................................................................................
........................................................................................................

**४. संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या भूमिकांमध्ये काय फरक आहे ?**

........................................................................................................
........................................................................................................
........................................................................................................
........................................................................................................

# पुस्तिकेतील प्रमुख कृती बिंदू

## शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना

शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना या वरील पुस्तिकेमधून आपल्या शेतकरी संस्थेसाठी मुख्य कृती बिंदू काय असू शकतात ते लिहूया.

## टिपणे

# टिपणे

# टिपणे

# मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकाची भूमिका

## एफपीओच्या संचालक मंडळास जबाबदार व उत्तरदायी असणे



- ❖ उद्देश, योजना आणि धोरणे तयार करण्यात मंडळाला मदत करणे
- ❖ मंडळाच्या निर्देशानुसार मंडळाची बैठक, सर्वसाधारण सभा, लेखा पालन, लेखा परीक्षा, वार्षिक परतावा इत्यादी विविध कायदेशीर अनुपालनाची खात्री करणे
- ❖ मंडळ व बाह्य अर्थसाह्य देणाऱ्या संस्थांना आवश्यक असणारे सर्व अहवाल सादर करणे
- ❖ शेतकरी संस्थेचे दैनंदिन कामकाज चालवणे

## मंडळाच्या संपूर्ण मार्गदर्शनाखाली सदस्यांना सेवा



- ❖ शेतकरी संस्थेच्या व्यवसायासाठी आणि सदस्यांच्या कल्याणाच्या संधी शोधणे, व्यावसायाची योजना तयार करून तिची अंमलबजावणी करणे.
- ❖ मंडळाच्या निर्देशानुसार सदस्यांना वेगवेगळ्या सेवा पुरवणे
- ❖ सभासदांना माहिती, प्रशिक्षण आणि परिचय
- ❖ शेतकरी संस्थेसाठी संसाधन (आर्थिक, तांत्रिक) प्राप्त करणे
- ❖ शेतकरी संस्थेसाठी वेगवेगळ्या आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती / उपलब्धता सुनिश्चित करणे

## संस्थात्मक प्रणाली आणि अंमलबजावणी



- ❖ योग्य लेखापालन ठेवणे; वार्षिक हिशोब तयार करणे आणि त्याचे लेखापरीक्षण करणे; मंडळासमोर आणि सदस्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत लेखापरीक्षित हिशोब मांडणे
- ❖ मंडळाच्या निर्देशानुसार कर्मचाऱ्यांची भरती करणे आणि त्यांच्या कामगिरीवर लक्ष ठेवणे
- ❖ एफपीओ – लेखा आणि लेखा पालन, देखरेख आणि अहवाल, उत्पादन, विपणन, प्रशासन, मनुष्यबळ विकास इत्यादी मध्ये संबंधित प्रणाली निर्माण करणे आणि अंमलबजावणी
- ❖ अर्थसहाय्य संस्था, भागीदार आणि सरकारी संस्था यांच्याशी योग्य संबंध




## एपीएमएएसबाबत

एपीएमएएस ही एक ना नफा ना तोटा या तत्वावर चालणारी राष्ट्रीय स्तरावरील स्त्रोत संस्था आहे महिला बचत गट (एसएचजी) आणि त्यांच्या संघटना, सहकारी संस्था, शेतकरी संस्था (एफपीओ) आणि इतर समुदाय आधारित संस्था (सीबीओ) ज्यांचा आत्मनिर्भर, परस्पर सहकार्य, स्वयं शिस्त अशा मार्गदर्शक मुल्यांवर ज्यांचा विश्वास आहे अशांच्या सबलीकरणासाठी एपीएमएएस कार्यरत आहे.



## परिकल्पना-शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना

शेतकरी संस्थांना प्रोत्साहन आणि साहाय्य करणाऱ्या संस्थांना शाश्वत उद्योग विकसित आणि मार्गदर्शन करण्यासाठी एपीएमएएसने शेतकरी संस्था साहाय्य केंद्र स्थापन केले आहे. या संस्था बळकट करण्यासाठी लागणारी ध्येय-धोरणे, प्रशासन-व्यवस्थापन क्षमता वाढवणे यासारख्या विविध सेवा उपलब्ध करून देत आहे. त्याचबरोबरही संस्था शेतकरी संस्थांना व्यवसाय नियोजन, आर्थिक दुवे, विपणन विकसित करण्यासाठी तांत्रिक साहाय्य उपलब्ध करून देते.

साहाय्य

DGRV

द्वारा प्रकाशित

BAIF

apmas